स.के.क्र. १०९३/२०२५
नि.क्र. ४

रोहा येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री एस. व्ही. खैरे )

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याची तारीख | ०७/०५/२०२५ |
| २ | प्रथम माहिती अहवाल व पोलीस ठाणे | रोहा पोलीस ठाणे गु.र.नं.१०३/२०२५ |
| ३ | प्रथम माहिती अहवाल दाखल दिनांक | ०७/०५/२०२५ |
| ४ | फिर्यादी/अहवाल देणार | ए. ए. टेंभेकर, रोहा पोलीस स्टेशन |
| ५ | आरोपीचे नाव, वय व पत्ता | १. **राजेश शामजी जहांगीर**<br>वय– ३१ वर्षे,<br>रा. धावीर रोड, डी. एस.पी. गल्ली,<br>ता. रोहा, जि. रायगड.<br>२. **वसीम मन्सुर डांगे**<br>वय– ४२ वर्षे,<br>रा. खालचा मोहल्ला,<br>ता. रोहा, जि. रायगड. |

गुन्हयाचा तपशिल

दि.०७.०५.२०२५ रोजी २०.३० वाजेच्या सुमारास मौजे रोहा येथील कुंडलिका नदी किनारी, विसर्जन घाट शेजारी असलेल्या बेकरीच्या मागे मोकळया जागेत तुम्ही आरोपी क्र.१ व २ गांजा या अंमली पदार्थाचे सेवन करीत असताना मिळुन आले व त्याद्वारे तुम्ही गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कलम ८(क) सह २७ अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

स.के.क्र. १०९३/२०२५
नि.क्र. ४

आरोपी क्र.१ व २ यांना अपराधाचे विवरण त्यांच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितले.

आरोपी क्र.१ चे प्रतिकथन –

१. तुम्हाला आरोपपत्र व संपूर्ण कागदपत्रांच्या नकला मिळाल्या आहेत काय?

उत्तर– होय.

२. तुम्हाला समजावून सांगीतलेला उपरोक्त गुन्हयाचा तपशील समजला आहे काय?

उत्तर– होय.

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर– मला गुन्हा कबुल आहे.

Rajesh

आरोपी क्र.१ ची सही

स्थळ : रोहा.
दिनांक – १४/०३/२०२६.

(एस.व्ही.खैरे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा.

आरोपी क्र.२ चे प्रतिकथन –

१. तुम्हाला आरोपपत्र व संपूर्ण कागदपत्रांच्या नकला मिळाल्या आहेत काय?

उत्तर– होय.

२. तुम्हाला समजावून सांगीतलेला उपरोक्त गुन्हयाचा तपशील समजला आहे काय?

उत्तर– होय.

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर– मला गुन्हा कबुल आहे.

आरोपी क्र.२ ची सही

स्थळ : रोहा.
दिनांक – १४/०३/२०२६.

(एस.व्ही.खैरे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा.

**<u>न्यायनिर्णय</u>**

आरोपी क्र.१ व २ यांनी नि.क्र.०३ वर पुरसिस दाखल करुन स्वच्छेने गुन्हा कबुल केला आहे. आरोपींनी शिक्षा देते वेळेस सहानुभुती दाखवावी अशी विनंती केली आहे. आरोपींनी स्वेच्छेने गुन्हयाची कबुली दिली आहे अशी माझी खात्री झाली आहे. म्हणुन आरोपींची कबुली स्विकारण्यात येते. गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कलम ८(क) सह २७ अन्वये आरोपींना ६ महिन्यांपर्यंत कारावासाची किंवा र. रु. १०,०००/– द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावता येते. परंतु आरोपींचे तरुण वय व त्यांच्यावर असलेली त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी पहाता त्यांना कारावासाऐवजी द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावणे न्यायोचित राहील. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१ **राजेश शामजी जहांगीर** व आरोपी क्र.२ **वसीम मन्सुर डांगे** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ प्रमाणे गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५

कलम ८(क) सह २७ अन्वये दंडनीय गुन्ह्याकरीता दोषी धरण्यात येते.

२. आरोपी क्र.१ व २ यांना गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कलम ८(क) सह २७ अन्वये दंडनीय गुन्हयाकरीता प्रत्येकी रक्कम रूपये १०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दहा हजार मात्र) द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपींनी द्रव्य दंडाची रक्कम भरण्यास कसूर केल्यास १ महिन्याची साधी कैद सुनावण्यात येते.

(एस.व्ही.खैरे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा

स्थळ : रोहा.
दिनांक – १४/०३/२०२६.

Received Fine Amount of Total Rs. 20,000/–
(Twenty Thousand Rs) Each 10,000/–

14/03/2026
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
रोहा, ता.रोहा, जि.रायगड

Fine 1091, 1092